आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१० ऑगस्ट २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांचं लोकार्पण, देशातली सर्वात लांब पल्ल्याची नागपूर-पुणे वंदे भारत गाडी सुरु

मतदानाबाबत केलेल्या आरोपांचं स्पष्टीकरण द्यावं, अशी कर्नाटकाच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची काँग्रेस नेते राहुल गांधी यांना नोटिस

अमेरिका आणि रशियाच्या अध्यक्षांच्या बैठकीत युक्रेन संघर्षावर निघणारा तोडगा निःपक्ष असावा अशी यूक्रेनची अपेक्षा

नाशिकमध्ये इगतपुरी इथं बेकायदेशीर कॉल से◌े◌ंटर रॅकेटचा सीबीआयकडून पर्दाफाश, पाच जणांना अटक

**आणि**

चीनमध्ये सुरु असलेल्या जागतिक स्पर्धेत तिरंदाजीमधे भारताच्या ऋषभ यादवची कांस्य पदकाची कमाई

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या कर्नाटक दौऱ्यात पुणे ते अजनी वंदे भारत रेल्वे गाडीचं दूरस्थ पद्धतीनं लोकार्पण केलं. बंगळुरूच्या केएसआर रेल्वे स्थानकावरून प्रधानमंत्र्यांनी पुणे ते अजनी, बंगळुरू ते बेळगाव आणि अमृतसर ते कटरा माता वैष्णोदेवी या तीन नव्या वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस नागपूर रेल्वे स्थानकावरून या समारंभात सहभागी झाले.

अजनी-पुणे ही महाराष्ट्रातली बारावी वंदे भारत गाडी असून, ८८१ किमी अंतर कापणारी, ती देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत गाडी आहे. ती ताशी ७३ किलोमीटर वेगानं धावेल, आणि नागपूर ते पुणे दरम्यान १० थांबे घेईल, या रेल्वेला शेगाव इथंही थांबा दिला आहे, असं मध्य रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नम्म मेट्रो सेवेच्या तिसऱ्या टप्प्याचं उदघाटनही आज झालं. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सुधारणा, कामगिरी, आणि परिवर्तन यांच्या

माध्यमातून विकसित भारत घडवण्यासाठी सरकारनं हाती घेतलेल्या योजनांची जंत्री त्यांनी सांगितली. सुमारे २२ हजार ८०० कोटी रुपये खर्चाच्या विविध मेट्रो प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण आज त्यांच्या हस्ते झालं.

**<><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नुकत्याच घेतलेल्या वार्ताहर परिषदेत निवडणूक आयोगाच्या आकडेवारीच्या हवाल्याने केलेल्या आरोपांचं स्पष्टीकरण द्यावं, अशी नोटिस कर्नाटकाच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी गांधी यांना बजावली आहे. राहुल गांधी यांनी मतदान अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे शकुन राणी यांनी दोनदा मतदान केल्याचा आरोप केला होता, मात्र तपासणीत राणी यांनी एकदाच मतदान केल्याचं समोर आलं आहे, असं या नोटिशीत म्हटलं आहे. तसंच, राहुल गांधी यांनी त्यांच्या सादरीकरणात दाखवलेली कागदपत्रं मतदान अधिकाऱ्यांनी जारी केलेली नसल्याचं प्राथमिक चौकशीत समोर आल्याचंही यात नमूद केलं आहे. या पार्श्वभूमीवर, शकुन राणी यांनी किंवा इतर कुणीही दोनदा मतदान केल्याचा दावा ज्या कागदपत्रांच्या आधारे केला, ती कागदपत्रं गांधी यांनी सादर करावीत, जेणेकरून सखोल चौकशी करता येईल, असं या नोटिशीत म्हटलं आहे.

**<><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात येत्या १५ ऑगस्ट रोजी अलास्का इथे होणाऱ्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर यूक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी मजबूत सुरक्षेवर भर दिला आहे. या बैठकीनंतर जो तोडगा निघेल तो निःपक्ष असावा असं झेलेन्स्की यांनी आपल्या समाज माध्यमावर सांगितलं आहे. यूक्रेनला त्याच्या सार्वभौमत्वाच्या आणि प्रादेशिक अखंडतेच्या रक्षणासाठी सक्षम होणं गरजेचं असून त्यासाठी विश्वासार्ह आणि दीर्घकालीन उपायांची गरजही झेलेन्स्की यांनी व्यक्त केली.

**<><><>**

पर्यावरणीय बाबींसंदर्भात भारत जागतिक स्तरावर नेतृत्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी केलं. ते गुजराथमध्ये देवभूमी द्वारका इथं जागतिक सिंह दिनानिमित्त राज्यस्तरावरच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

वाघांच्या सात प्रजातींपैकी पाच भारतात आढळतात असं नमूद करुन प्रोजेक्ट लायन, प्रोजेक्ट टायगर, प्रोजेक्ट चित्ता या प्रकल्पांच्या माध्यमातून भारताचे पर्यावरणकेंद्री संवर्धन मॉडेल आकाराला येत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

<><><>

नाशिक इथं होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी विविध यंत्रणांनी शासनाकडे सादर केलेल्या सुमारे २४ हजार कोटी रुपये खर्चाच्या आराखड्यांपैकी ५ हजार १४० कोटी रुपयांच्या विविध कामांना कुंभमेळा प्राधिकरणानं मंजुरी दिली आहे. तसंच महापालिकेच्या साडेसात हजार कोटी रुपये खर्चात कपात करून ३ हजार २०० कोटी रुपयांची कामं प्राधान्यानं येत्या दोन वर्षांत पूर्ण करण्याची अटही घातली आहे.

<><><>

बिहारमधल्या सर्व नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या बूथ स्तरावरच्या एजंटना मतदारयाद्या पुनरिक्षणचा भाग म्हणून अद्ययावत मतदार याद्यांचा मसुदा देण्यात आल्याचं, भारतीय निवडणूक आयोगानं सांगितलं आहे. या मसुद्यात मृत, स्थलांतरित आणि बोगस मतदारांचा समावेश असून बूथ एजंटनी या नावांबाबत हरकत घेणारं पत्र पुराव्यासह बूथ अधिकाऱ्याकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बूथ अधिकारी या पुराव्यांची पडताळणी करून याद्या अद्ययावत करतील.

<><><>

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर, आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढत असल्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारांकडे सजगपणे बघावं, सावध राहावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपूरमध्ये केलं. आर्थिक फसवणुकीला बळी पडलेल्यांना सुमारे १० कोटी रुपये परत देण्याचा कार्यक्रम, तसंच नागपूर पोलिसांनी विकसित केलेल्या गरुडदृष्टी समाजमाध्यम निगराणी प्रकल्पाचं सादरीकरण फडनवीस यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते.

<><><>

सीबीआयनं नाशिकमध्ये इगतपुरी इथं सुरु असलेल्या एका बेकायदेशीर कॉल सेंटर रॅकेटचा पर्दाफाश केला. या प्रकरणी सीबीआयनं मुंबईतल्या सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल

करून त्यातल्या पाच जणांना अटक केली आहे. काही अज्ञात व्यक्तींवरही गुन्हा दाखल झाला, ज्यामध्ये बॅक कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे.

या कारवाईत पोलिसांनी ४४ लॅपटॉप, ७१ मोबाईल फोन आणि डिजिटल सामग्री ताब्यात घेतले आहे. याशिवाय या ठिकाणी सुमारे १ कोटी २० लाखाची रोकड, ५०० ग्रॅम सोनं, आणि एक कोटीपर्यंत किंमत असलेल्या सात गाडया जप्त केल्या. घटनास्थळी जवळपास ५ लाखापर्यंतची क्रिप्टोकरन्सीचे व्यवहार आणि दोन हजारापर्यंत कॅनेडिन डॉलर्सचे गिफ्ट व्हाउचर्स आढळले.

<><><><>

चीनमध्ये चेंगदू इथं सुरु असलेल्या जागतिक स्पर्धेत तिरंदाजीमधे भारताच्या ऋषभ यादवनं कांस्य पदक पटकावलं आहे. दहाव्या मानांकित ऋषभनं उत्तम कामगिरी करत अनेकवेळा सुवर्णपदक जिंकलेल्या अभिषेक वर्माचा पराभव केला. महिलांच्या कंपाऊंड प्रकारात मात्र भारताच्या परणित कौर आणि मधुरा धामणगावकर यांचं आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आलं.

<><><><>

आशियाई सर्फिंग स्पर्धेत रमेश बुधियाल हा या क्रीडाप्रकारात पुरुषांच्या खुल्या श्रेणीत पदक मिळवणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. त्यानं आज या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं.

<><><><>

टोकियोत एका स्पर्धेदरम्यान मेंदूला दुखापत झालेल्या हिरोमासा उराकावा या जपानी मुष्टियोद्ध्याचा मृत्यू झाला आहे. आठ दिवसांपूर्वी झालेल्या एका सामन्यात प्रतिस्पर्ध्यानं मारलेल्या ठोश्यांमुळे त्याच्या डोक्याला दुखापत झाली होती. त्यांनतर त्याच्या मेंदूत झालेली रक्ताची गाठ काढण्यासाठी सुरू असलेल्या शस्त्रक्रियेदरम्यान त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान, ओरिएंटल आणि पॅसिफिक मुष्टियुद्ध स्पर्धेत सामन्यातल्या फेऱ्यांची संख्या १२ वरुन १० केली असल्याचं जपान बॉक्सिंग कमिशननं जाहीर केलं आहे.

<><><><>

चाड या मध्य आफ्रिकेतल्या देशाचे माजी प्रधानमंत्री सुक्से मसरा यांना जनतेमध्ये द्वेष आणि वैरभावना पसरवल्याप्रकरणी एका फौजदारी न्यायालयानं काल २० वर्षांची शिक्षा सुनावली. मसरा यांनी नागरिकांना हिसाचाराला प्रवृत्त केल्यामुळे एका गावात झालेल्या दंगलीत ४२ जणांचा मृत्यू झाल्याचं सरकारी चौकशीत समोर आल्यानंतर मे महिन्यात त्यांना अटक झाली होती.

<><><>

प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणाला प्रतिबंध करण्यासाठी एका जागतिक करारावर वाटाघाटी करण्याच्या उद्देशानं स्वित्झर्लंडमधल्या जिनेव्हा इथं १८४ देशांचे प्रतिनिधी एकत्र आले आहेत. प्लास्टिक विरोधी आंतरराष्ट्रीय कायदेशीर प्रतिबंधक साधन विकसित करण्यासाठी जिनेव्हा इथं आंतरसरकारी वाटाघाटी समितीचं पाचवं सत्र सुरू आहे. ही समिती वेगवेगळ्या टप्प्यांवर प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाला रोखण्यासाठी महत्त्वाकांक्षी करारावर काम करत आहे.

<><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या कराचा परिणाम हळूहळू अमेरिकेचा शेअर बाजार आणि अर्थव्यवस्थेवरही होऊ शकतो. वन वर्ल्ड आऊटलुकच्या अहवालानुसार या करामुळे लगेच आर्थिक संकट कोसळण्याची शक्यता नसली, तरी कालांतरानं यामुळे ग्राहकांवर ताण येण्याची, बाजारपेठांवर विपरीत परिणाम होण्याची आणि प्रत्युत्तरादाखल इतर देशाही पावलं उचलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

<><><>

जपानच्या किरिशिमा पर्वतरांगेत आज एका ज्वालामुखीचा मोठा उद्रेक झाला. यातली राख तीन किलोमीटरपर्यंत पसरली. यामुळे मियाझाकी प्रांतातल्या कोबायासी आणि ताकाहारू इथं, तर कागोशिमा प्रांतातल्या किरिशिमा इथं मध्यम प्रमाणात राखेचा वर्षाव होण्याची शक्यता जपानच्या हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

<><><>

भारतीय तंत्रज्ञान क्षेत्राला सर्वोत्तम प्रतिभावंत मिळवून देण्यात भारतीय अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेनं महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, असं इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन् यांनी म्हटलं आहे. ते आज तिरुअनंतपुरम मधल्या वलियमला इथं या

संस्थेच्या १३ व्या दिक्षांत सोहळ्यात दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बोलत होते. भारतीय अर्थव्यवस्था ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असून भारताच्या या यशात इस्रोचा मोठा वाटा आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

हवामान विभागानं हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि सिक्कीम या राज्यांना उद्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर अंदमान निकोबार बेटं, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, बिहार, मध्य प्रदेश, हरियाणा, दिल्ली , पंजाब, तेलंगाणा  या राज्यांच्या काही भागात उद्या सोसाट्याचा वारा आणि विजेच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यताही वर्तवली आहे. महाराष्ट्र, ओदिशा,  तेलंगाणा, जम्मू आणि काश्मीर, लडाख, छत्तीसगड या राज्यात उद्या मेघगर्जनेसह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**